☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# भद्रावती पोलीसांची दारू तस्करीवर कार्यवाही
# १८ लक्ष २६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १०/०६/२०१९ रोजी भद्रावती येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी इनोव्हा वाहनाने नागपुर ते चंद्रपुर कडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून भद्रावती पोलीस पथकाने सुमठाणा चौक येथे नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी केली असता, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक इनोव्हा वाहन येतांना दिसले सदर वाहनास थांबवुन संशयावरून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैधरित्या ४० पेटया ऑफीसर चॉईस कंपनीची विदेशी दारू किं. ५,७६,०००/—रू, ऑफीसर चॉईस ब्लु कंपनीच्या विदेशी दारूच्या ३ पेटया ४३,०००/—रू, एक चारचाकी टोयोटा इनोव्हा वाहन क. एम.एचए ३१ सीपी ८८४१ किं. १२,००,०००/—रू, तीन मोबाईल फोन किं. ७,०००/—रू, **असा एकुण १८,२६,२००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १) प्रफुल नरेंद्र कालोकार वय २२, देवलापार, रामटेक नागपुर २) स्वप्नील अरविंद क्षिरसागर वय ४४ रा.गजानन नगर वर्धा रोड नागपुर यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात भद्रावती प्रभारी पोनि. श्री. यादव, यांचे नेतृत्वात पोउपनि बेलसरे यांचे सह भद्रावती येथील पोलीस कर्मचारी यांनी पार पाडली.

---

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस २९/०४/२०१९ रोजी **कु. एस.जे. अंसारी, विशेष न्यायाधीश चंद्रपुर यांनी १० वर्ष सश्रम कारावासाची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत राहणारे यातील फिर्यादी महिला ही दिनांक १३/०९/२०१६ रोजी गडचांदुर येथे आठवडी बाजार असल्याने बाजारासाठी जाताना ते आपल्या दोन अल्पवयीन मुलींना परिचयाचे असलेल्या शेजारच्या घरी सोडुण बाजर करण्यासाठी गेले होते. त्यादरम्यान दोन्ही मुली शेजारच्या घरी अंगणात खेळत होत्या. त्या घरी राहणारा मुलगा नामे विकास श्रवण सिडाम याने त्या मुलीला एकटे पाहुन तिचेवर जबरीने अत्याचार केला. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन गडचांदुर येथे अप.क्र. ९०/२०१६ कलम ३७६(२)(आय) भादंवि, सहकलम ३,४,५,६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास मपोउपनि. श्रीमती. फुसे, पोलीस स्टेशन गडचांदुर यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २९/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे विकास श्रवण सिडाम, वय २२ रा. बैलमपुर वार्ड क्र. २ ता. राजुरा. जि. चंद्रपुर कलम ३७६(२)(आय) भादंवि सहकलम ६ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/—रू दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावासाची, तसेच ३,४,५ एम पोक्सो मध्ये ०७ वर्ष शिक्षा, कु. एस.जे. अंसारी, विशेष न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. डी.व्ही. महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. गिरीजाशंकर यादव पोस्टे गडचांदुर यांनी काम पाहिले.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# रामनगर पोलीसांच्या विशेष कार्यवाही अर्तंगत ०५ लक्ष ९५ हजार ६०० रू.चा एकुण ५९ किलो गांजा जप्त.

आज दिनांक १० जुन २०१९ रोजी रामनगर पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, तेलगंना येथुन दोन इसम हे गांजाची तस्करी करणार आहे. या माहिती वरून रामनगर पोलीसांनी बल्लारशहा रोड वरील डिआरसी क्लब जवळील रयतवारी चौक येथे सापळा रचला. मिळालेल्या माहितीच्या आधारावर तस्कर हे प्रवासी म्हणुन ऑटो मध्ये येत असल्याने माहितगाराने वर्णन केलेल्या ऑटोस थांबविण्यात आले. सर्व प्रवासी यांना खाली उतरून झडती घेतली असता त्यामधील दोन प्रवासी यांनी दोन पुतडीमध्ये एकुण ५९ किलो गांजा भरून आणलेला होता. पोलीसांनी तात्काळ त्या दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेउन एकुण ५९ किलो गांजा किंमत ०५ लक्ष ९५ हजार ६०० रू. च्या मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपीतां विरूध्द पोलीस स्टेशन रामनगर येथे कलम २०, २२ अंमली औषधीद्रव्ये व मनाप्रभावी पदार्थ अधिनियम (एनडिपीएस) १९८५ अन्वये गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शिलवंत नांदेडकर यांच्या नेतृत्वात ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. हाके यांचे पथक सपोनी दरेकर, पोउपनी मोरे, पोहवा आनंद परचाके, गजानन डोईफोडे, मनोहर कामडी, नापोशी सुरेश कसारे, सुरेश धाडसे, दिनकर धोबे, पोशी निलेश मुंडे, रूपेश पराते, राकेश निमगडे, चालक प्रभुशंकर गावडे, ज्ञानेश्वर मडावी यांनी पार पाडली.

---